# महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १६ मार्च, २०१७.

## अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६:*

**टिपीएस-१६१६/प्र.क्र.२२२/२०१६/नवि-९** (E-file 243646): ज्याअर्थी, अहमदनगर शहरातील दुसरी सुधारीत विकास योजना शासनाने निर्णय क्र.टिपीएस-१६९९/१६१२/सीआर-२७(ब)/०३/नवि-९ दि.४/७/२००५ अन्वये भागश: मंजूर केली असून ती दि. २२/८/२००५ पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना अधिसूचना क्र.टिपीएस-१६९९/१६१२/सीआर-२७(ब)/०३/नवि-९ दि.४/७/२००८ रोजी मंजूर झालेली असून ती दि.२१/८/२००८ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेसाठी अहमदनगर महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे अहमदनगर येथील नगर रचना योजना क्र.३ मधील भूमापन क्र. २११ या जागेवर आरक्षण क्र. १६४ "बगीचा" अंदाजे क्षेत्र ०.७५ हेक्टर हे आरक्षण (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधले आहे) प्रस्तावित आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ३९ दि. २९/१/२०१० अन्वये उक्त विकास योजनेत फेरबदल करुन "आरक्षण क्र. १६४-बगीचा" हे आरक्षण वगळून त्याऐवजी सदर आरक्षणाखालील क्षेत्रामध्ये "वाहनतळ" असे आरक्षण प्रस्तावित करण्याचे ठरवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन फेरबदल प्रस्ताव (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असे संबोधले आहे) अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करावा, असे शासनाचे मत झाले आहे ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन शासन उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करीत आहे ;

सदरची अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करण्यात येत आहे ;

सदर अधिसुचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,*

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते

(रा.शा. चौहान)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Dated : 16th March, 2017**

**NOTIFICATION**

*Maharashtra Regional & Town Planning Act, 1966*

**No.TPS-1616/CR-222/2016/UD-9** (E-file 243646): Whereas, the Government in Urban Development Department has sanctioned the Ahmednagar Development Plan (Second Revised) (Part) vide Notification No. TPS-1699/1612/C.R.27(B)/03/UD-9, dated 04th July, 2007 (hereinafter referred to as "the Said Development Plan") and has come into force with effect from the dated 22nd August, 2005 and for the remaining area vide Notification No. TPS-1699/1612/C.R.27(B)/03/UD-9, dated 4th July, 2008 (hereinafter referred to as "the Said Development Plan") and has come into force with effect from the dated 21st August, 2008 (hereinafter referred to as the "said Notification") ;

And whereas, the Ahmednagar Municipal Corporation is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as "the said Planning Authority") ;

And whereas, according to the proposals of the said Development Plan, Final Plot No.211 of Ahmednagar Town Planning Scheme No.3 is reserved for "Site No. 164 - Garden", admeasuring about 0.75 ha. (hereinafter referred to as "the said lands") ;

And whereas, the said Planning Authority vide its General Body Resolution No. 39, dated 29th January, 2010 resolved to delete the "Site No. 164-Garden", (hereinafter referred to as "the said Modification") by carrying out a modification to the said Development Plan by following all the legal formalities stipulated under section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that not to accord the said modification needs to be refused to accord sanction ;

Now therefore in, exercise of powers conferred by sub-section (2) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby refuses to accord sanction to the said Modification ;

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of the Commissioner, Ahmednagar Municipal Corporation ;

This notification shall also be published on the Government web-site www.maharashtra.gov.in

*By order and in the name of the Governor of Maharashtra,*

(R. S. Chouhan)
**Section Officer to Government**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

# अधिसूचना

**दिनांक :- १६ मार्च, २०१७**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६:**

**टिपीएस- १६१६/५८३/प्र.क्र.२६७/१६/नवि-०९** (E-file No. 243761):- ज्याअर्थी, शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस १६११/ २१८९/सीआर २५० (बी) /२०११/ युडी-९ दि.०४.०४.२०१२ अन्वये अहमदनगर शहरासाठी वाढीव हद्दीची विकास योजना (भागशः) (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) मंजूर केलेली असून ती दि.२५.०५.२०१२ पासून अंमलात आहे तसेच वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना अधिसूचना क्र. टिपीएस १६१२/४५० (एन)/ प्र.क्र. ३३/२०१३/ नवि-९ दि.२१.०१.२०१५ अन्वये मंजूर आहे. (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे); आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेसाठी अहमदनगर महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये आ.क्र. १०४ "क्रिडांगण", आ.क्र. १०५ "पार्क", आ.क्र.१०६ "बगीचा", आ.क्र. १०७ "माध्यमिक शाळा व क्रिडांगण", आ.क्र.१०८ "क्रिडांगण" व आ.क्र.११० "प्राथमिक शाळा व क्रिडांगण" (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधले आहे) ही आरक्षणे प्रस्तावित आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२७, दिनांक २९.१२.२०१४ अन्वये उक्त विकास योजनेत फेरबदल करुन " आ.क्र. १०४ "क्रिडांगण", आ.क्र. १०५ "पार्क", आ.क्र.१०६ "बगीचा", आ.क्र. १०७ "माध्यमिक शाळा व क्रिडांगण", आ.क्र.१०८ "क्रिडांगण" व आ.क्र.११० "प्राथमिक शाळा व क्रिडांगण"" ही आरक्षणे वगळून त्याखालील क्षेत्र"रहिवास" असे प्रस्तावित करण्याचे ठरवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी आयुक्तांना अधिकार प्राथमिक ठरावाद्वारे दिलेले आहेत व असा प्रस्ताव दि.१८.०१.२०१६ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करावा, असे शासनाचे मत झाले आहे;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन शासन उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

सदरची अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करण्यात येत आहे.

सदर अधिसुचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(रा.शा.चौहान)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

C:\Users\dhairyashil.patil\Desktop\Section ३७ (२) Rejection.docx

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumbai 400 032.**

**NOTIFICATION**

**Dated :- 16th March, 2017**

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

**No.TPS-1616/583/CR-267/2016/UD-09** (E-file No. 243761): Whereas, The Government in Urban Development Department, vide Notification No.TPS-1611/2189/CR-250(B)/2011/UD-09 dt.04.04.2012 has sanctioned the development Plan (Part) for the Extended Boundary of Ahmadnagar City (hereinafter referred to as ' the Said Development Plan') and has come into force with effect from the dated 25th may,2012 (hereinafter referred to as the "said Notification"); and whereas, the Ahmadnagar Municipal Corporation is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as "the said Planning Authority");

And whereas, according to the proposals of the said Development Plan, Site No.104 "Playground", Site no.105 "Park", Site No.106 "Garden", Site No.107 "Primary school & Playground" Site No.108 "Playground", and Site No.110 "Primary school & Playground" reservations are proposed (hereinafter referred to as "the said lands");

And whereas, the said Planning Authority vide its General Body Resolution No. 27, dated 29/12/2014 resolved to modify the said Site No.104 "Playground", Site no.105 "Park", Site No.106 "Garden", Site No.107 "Primary school & Playground" Site No.108 "Playground", and Site No.110 "Primary school & Playground" and to be included in Residential Zone (hereinafter referred to as "the said Modification") by carrying out a modification to the said Development Plan, by following all the legal formalities stipulated under section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act"), and the General body by its Primary resolution have authorized the Commissioner to forward the proposal to Government after following all legal formalities; and such proposal has been submitted to Government vide letter dt.18.01.2016.

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the said modification needs to be refused to accord sanction;

Now therefore in, exercise of powers conferred by sub-section (2) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby refuses to accord sanction to the said Modification.

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of the Commissioner, Ahmadnagar Municipal Corporation,

This notification shall also be published on the Government web-site www.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra.

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(R. S. Chouhan)
Section Officer to Government